**नवीन नागरी कामांना प्रशासकीय मान्यता किंवा सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यासंदर्भात निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०२६/प्र.क्र.४०/अर्थ-३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- २१ जुलै, २०२६.

**संदर्भ** :- नियोजन विभाग, शासन निर्णय क्र.ससमा २०२६/प्र.क्र.०४/का-१४६१,दिनांक ०५ जून,२०२६.

**परिपत्रक**

नियोजन विभाग, शासन निर्णय दिनांक ०५ जून, २०२६ अन्वये रस्ते, महामार्ग, पूल, बोगदे, रेल्वे, विमानतळे, धरण, साठवण तलाव, पाणी पुरवठा योजना, मल:निसारण प्रकल्प, पूरसंरक्षक बंधारे, कालवे, इमारती व इमारतींचे विद्युतीकरण व दुरुस्ती व यासारख्या नवीन नागरी कामांना प्रशासकीय मान्यता किंवा सुधारीत प्रशासकीय मान्यता देताना विचारात घ्यावयाच्या मार्गदर्शक सूचना नियोजन विभागाकडून निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

२. नागरी कामांना प्रशासकीय मान्यता किंवा सुधारीत प्रशासकीय मान्यता देताना संदर्भाधिन शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांचे प्रशासकीय विभागांनी काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. सदर शासन निर्णयाचे पालन होत नसल्याचे निदर्शनास आल्यास सदर कामांना ज्या लेखाशिर्षांतर्गत निधी अर्थसंकल्पीत करण्यात येतो, त्या लेखाशिर्षाच्या निधी वितरणावर निर्बंध घालण्यात येतील, याची सर्व प्रशासकीय विभागांनी नोंद घ्यावी.

३. तद्नुषंगाने शासन निर्णयामध्ये नमूद नागरी कामांच्या संदर्भातील निधी वितरणाचे प्रस्ताव वित्त विभागास सादर करताना, संबंधित लेखाशीर्षांतर्गत निधी वितरणाच्या प्रस्तावामध्ये खालील बाबींची माहिती अंतर्भूत करणे आवश्यक राहील, सदर माहिती अभावी निधी वितरणाच्या प्रस्तावावर कार्यवाही न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित प्रशासकीय विभागाची राहिल.

अ) मागील तीन आर्थिक वर्षातील प्रत्यक्ष खर्चाची सरासरी.

ब) मागील वित्तीय वर्षातील प्रलंबित दायित्व व चालू वित्तीय वर्षातील नवीन दायित्व असे एकूण दायित्व.

४. मा. मंत्रिमंडळ तसेच उच्चाधिकार समितीकडे सादर केल्या जाणाऱ्या पायाभूत सुविधाविषयक सर्व प्रस्तावांमध्ये मागील ३ आर्थिक वर्षातील प्रत्यक्ष खर्चाची सरासरी तसेच चालू व नवीन कामांशी संबंधित दायित्वांचा समावेश करण्यात यावा.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२६०७२११३१६४३३४०५ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by RAVINDRA SITARAM JARANDE
Date: 2026.07.21 13:17:37 +05'30'

**(र.सि.जरांडे)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, लोकभवन, मलबार हिल, मुंबई,
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३) मा. राज्यमंत्री (वित्त), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
४) सर्व मा.मंत्री आणि मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,मंत्रालय, मुंबई,
६) सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
७) सचिव, विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
८) सर्व सह सचिव / उप सचिव (अर्थसंकल्प शाखा), सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई,
९) उप सचिव (नोंदणी शाखा), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१०) विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली ११०००१,
११) प्रधान महालेखापाल - १/२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१२) प्रधान महालेखापाल - १/२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१३) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
१४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१५) निवासी लेखा अधिकारी, मुंबई,
१६) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१७) सर्व सह सचिव / उप सचिव / अवर सचिव/ कक्ष अधिकारी, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
१८) निवड नस्ती, अर्थ-३, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.